“महाराष्ट्राच्या राजकारणातील काँग्रेस पक्षाचा ऱ्हास एक राज्यशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ २०१४-२०२३”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान विद्याशाखेतंर्गत
राज्यशास्त्र या विषयातील पीएच.डी. पूर्व संशोधन आराखडा

संशोधक

शेट्टीवार सायलु पंढरी

मार्गदर्शक

प्रा. डॉ. प्रताप वामनराव पाटील

राज्यशास्त्र विभागप्रमुख

बहिर्जी स्मारक कॉलेज, बसमत

ता.बसमत जि.हिंगोली

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

डिसेंबर : २०२२

प्रस्तावना

राष्ट्रीय काँग्रेस भारतातील एक राष्ट्रीय राजकीय पक्ष आहे. काँग्रेसची स्थापना २८ डिसेंबर इ.स. १८८५ मध्ये ब्रिटिश अधिकारी एलेन ओक्टेवियन ह्यूम, दादाभाई नौरोजी आणि दिनशा वाचा यांनी केली. मुंबईच्या तेजपाल संस्कृत पाठशाळेत संपूर्ण देशभरातील ७२ प्रतिनिधी एकत्र येऊन २८ डिसेंबर १८८५ रोजी 'इंडियन नॅशनल काँग्रेस' म्हणजेच राष्ट्रीय सभेची स्थापना करण्यात आली. पूर्वनियोजित राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अधिवेशन २२ डिसेंबर १८८५ पुणे या ठिकाणी घेतले जाणार होते. मात्र पुण्यात कॉलराची साथ सुरू असल्यामुळे हे अधिवेशन मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत पाठशाळेत घेतले गेले. राष्ट्रीय काँग्रेसच्या या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष कलकत्त्याचे ख्यातनाम वकील व्योमेशचन्द्र बॅनर्जी हे होते. राष्ट्रीय काँग्रेसच्या माध्यमातून सरकार व जनता यांच्यामध्ये एक संवादात्मक स्वरूपाची वाटचाल सुरू झाली. सुरुवातीच्या काळामध्ये काँग्रेसचे नेतृत्व हे मवाळ गटाकडे होते. पुढे १९०६ ते १९१९ पर्यंत काँग्रेसचे नेतृत्व जहाल गटाकडे म्हणजेच लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस, गोपाळ गणेश आगरकर यांच्याकडे होते. त्यानंतर मात्र १९२० ते १९४७ या काळामध्ये संपूर्ण काँग्रेसचे नेतृत्व हे महात्मा गांधींनी केले. गांधी आणि नेहरू घराण्याची परंपरा लाभलेल्या काँग्रेस पक्षाने भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये आणि स्वातंत्र्यानंतर देखील देशाच्या राजकारणामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे. महत्त्वाच्या राष्ट्रीय पक्षांमध्ये काँग्रेस पक्षाचे स्थान कायम आहे. मधल्या काळामध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला अनेक स्थित्यंतरातून जावे लागले. देशातील अंतर्गत घडामोडी, स्थित्यंतरे, पक्ष राजकारण या समस्यांना तोंड देत भ्रष्टाचार, बेरोजगारी आर्थिक मंदी यासारख्या समस्यांना तोंड देत सत्तेवर असताना काँग्रेस पक्षाने देशाच्या हिताच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडित

जवाहरलाल नेहरू हे काँग्रेस पक्षाचे निष्ठावान अनुयायी होते. महात्मा गांधींच्या समवेत त्यांनी स्वातंत्र्य चळवळीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून देखील त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. पंचशील करार, अलिप्ततावाद यासारख्या महत्त्वपूर्ण धोरणाचे ते समर्थक होते. अवजड उद्योग उभारणाऱ्या यंत्रणा देशामध्ये उभ्या राहिल्या पाहिजेत असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्या काळामध्ये रशियन राज्यक्रांतीने जी प्रगती घडून आली, आपल्याही देशांमध्ये अशाच प्रकारे प्रगती झाली पाहिजे यासाठी त्यांनी पंचवार्षिक योजनाचा स्वीकार केला. याचबरोबर कृषीक्षेत्र औद्योगिकक्षेत्र, संशोधन यासारख्या घटकांना त्यांनी प्राधान्यक्रम दिला. काँग्रेस संघटनाच्या माध्यमातून पक्षाचे सर्व ध्येयधोरणे तळागाळापर्यंत पोचविण्याचे काम कार्यकर्त्यांनी केले. धर्मनिरपेक्ष विचारसरणीच्या आधारे संपूर्ण देशाच्या विकासाची पायाभरणी करण्याचे महत्वपूर्ण कार्य काँग्रेस पक्षाने केले.

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये काँग्रेस पक्षाने दीर्घकाळ सत्ता उपभोगली आहे. यामध्ये १९५६ ते १९७६ या काळात महाराष्ट्रात काँग्रेसचे स्थिर सरकार राहिले. त्यानंतर १९७७ ते १९८० चा अपवाद वगळता १९९५ पर्यंत महाराष्ट्रात एकहाती सत्ता काँग्रेस पक्षाकडेच होती. १९९९ मध्ये काँग्रेसअतंर्गत मतभेद होऊन शरद पवार हे काँग्रेस मधून बाहेर पडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. १९९९ ते २०१४ पर्यंत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आघाडी करून महाराष्ट्रात सत्ता उपभोगली. एकंदरीत स्वातंत्र्योत्तर काळात १९७७ ते १९८०, १९९५ ते १९९९ आणि २०१४ ते २०१९ हा अपवाद वगळता महाराष्ट्रात जवळपास ५५ वर्ष काँग्रेस पक्ष सत्तेवर होता. महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शंकरराव चव्हाण, शरद पवार, विलासराव देशमुख, वसंतराव नाईक, सुधाकर नाईक, पृथ्वीराराज चव्हाण, सुशीलकुमार शिंदे, शिवाजीराव निलंगेकर, ए.आर. अंतुले, अशोराव चव्हाण, नाना पटोले इत्यादी राजकीय नेतृत्वाचे वलय काँगेस

पक्षाला मिळाले. परंतु २०१४ नंतर महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाचा ऱ्हास होऊण्यास सुरूवात झाली.

संशोधन समस्या

संशोधनकार्यात समस्येला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. क्षेत्र कोणतेही असो मग ते कृषी, आरोग्य, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, वैज्ञानिक, भौगोलिक, अवकाश, भूगर्भ इत्यादीमध्ये संशोधन समस्या केंद्रस्थानी असते. संशोधन समस्या निश्चित केल्याशिवाय संशोधनकार्य करणे अशक्य असते. संशोधनाच्या पायऱ्यामध्ये संशोधन समस्या ही प्रथम पायरी आहे. त्यामुळे संशोधकाला संशोधन करण्यासाठी सर्वप्रथम संशोधन ससस्या निवडणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधन समस्येत २०१४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या निवडणुकीवर गुजरात मॉडलेच वर्चस्व निर्माण झालेले वर्चस्व कायम राहिले आहे का? काँग्रेस पक्षाची १५ वर्षाची सत्ता जाण्यास कोणते घटक कारणीभूत होते? इत्यादी बाबींचा अभ्यास करण्यासाठी "महाराष्ट्राच्या राजकारणातील काँग्रेस पक्षाचा ऱ्हास एक राज्यशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ २०१४-२०२३" हा संशोधन विषय निवडण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधनाची काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत ती पुढीलप्रमाणे-

१. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२. महाराष्ट्राच्या राजकीय जडणघडणीचा अभ्यास करणे.

३. महाराष्ट्रातील राजकीय पक्ष पद्धतीचा अभ्यास करणे.

४. महाराष्ट्रातील प्रभावशाली राजकीय पक्षाचा आढावा घेणे.

५. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या यशस्वी वाटचालीत महत्त्वपूर्ण घटकांचा अभ्यास करणे. त्त्व

६. महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव पाडणाऱ्या घटकांचा शोध घेणे.

७. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या ऱ्हासांची कारणे शोधणे.

संशोधन विषयाची गृहीतके

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी निश्चित केलेले गृहीतकृत्ये पुढीलप्रमाणे मांडली आहेत.

१. महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी वैभवशाली असून तीने भारती राजकारणाला दिशानिर्देश देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

२. महाराष्ट्राच्या राजकीय जडणघडणीचा सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहर, देवगीचे यादव इत्यादी राजकीय सत्तांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

३. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रामध्ये १९७७ पर्यंतचा अपवाद वगळता राष्ट्रीय राजकीय पक्षांबरोबर प्रादेशिक पक्षांचा दबदबा राहिलेला दिसून येतो.

४. सहकार क्षेत्र आणि शिक्षण सम्राटामुळे राष्ट्रीय काँग्रेस या पक्षांचे एकतर्फी वर्चस्व महाराष्ट्राच्या राजकारणावर राहीले आहे.

५. जात, धर्म, भाषा आणि भूमीपूत्राचे आंदोलने महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव टाकणारे निर्णायक घटक आहेत.

६. राष्ट्रीय काँग्रेसमधील वाढता भ्रष्टाचार, जाहीरनाम्यातील दिलेल्या आश्वासनाकडे दुर्लक्ष, वाढती महागाई, वाढत्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या इत्यादी कारणे काँग्रेसच्या ऱ्हासास कारणीभूत ठरले आहेत.

संशोधन विषयाचे महत्त्व

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली तेव्हापासून १९७७ व १९९५ च्या विधानसभा निवडणुकीचा अपवाद वगळता २०१४ पर्यंत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व महाराष्ट्रावर राहीले आहे. हे वर्चस्व कायम टिकून राहण्यासाठी जातीय, धार्मिक, प्रादेशिक, भाषिक, सहकार इत्यादी घटकांची महत्त्वपूर्ण भूमिका, तसेच सत्ताधारी पक्षाने १९९९ ते २०१४ दरम्यानच्या काळात जनउपयोगी राबविलेले ध्येय धोरणे आणि महाराष्ट्राच्या राजकीय जडणघडणीचा विचार करता देश पातळीवर प्रगत राज्य म्हणून ओळख निर्माण करण्यात काँग्रेस पक्षाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. असे असतानासुद्धा २०१४ नंतर महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्षाचा ऱ्हास होण्यास सुरूवात झाली. या पराभवाची कारणमिमांसा करण्यासाठी संशोधन विषयाला अनन्यसाधारण असेच महत्त्व आहे. यासाठी "महाराष्ट्राच्या राजकारणातील काँग्रेस पक्षाचा ऱ्हास एक राज्यशास्त्रीय अभ्यास : विशेष संदर्भ २०१४-२०२३" हा विषय निवडला होता.

संशोधन पद्धती

संशोधनाचे प्रामुख्याने व्यावहारिक संशोधन, क्रियात्मक संशोधन आणि मूलभूत सशोधन असे तीन प्रकार पडतात. व्यावहारिक संशोधनातून जे निष्कर्ष समोर येतात त्यांचा उपयोग समाजाचे कल्याण करण्यासाठी होत असतो. हे संशोधन प्रामुख्याने सामाजिक जीवनाच्या व्यवहारांशी संबंधित असते. क्रियात्मक संशोधन आणि व्यावहारिक संशोधन हे परस्पराशी पूरक असून क्रियात्मक संशोधनाचा मुख्य उद्देश वर्तमान परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचा असतो. उदा.वांशिक तणाव, गलिच्छ वस्ती सुधार, पूर्वग्रह किंवा प्रशासकीय व्यवस्थेतील परिवर्तन यांच्याशी संबंधित असते. तर मूलभूत संशोधनात एखादी घटना, विचार किंवा समाजात उद्भवलेल्या समस्यांचे कारण शोधले जाते. या संशोधनात समस्येचे निदान करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना

केल्या जात नाहीत. या संशोधन पद्धतीला गुणात्मक संशोधन असे म्हटले जाते. मूलभूत संशोधन हे अमूर्त किंवा चल घटकांशी संबंधित असल्यामुळे त्यांच्यामध्ये स्थळकाळपरत्वे बदल होत असतात. त्यामुळे प्रस्तुत संशोधन मूलभूत अध्ययनाशी संबंधित असल्यामुळे तुलनात्मक, ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक या संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे. त्याबरोबरच आवश्यक त्या ठिकाणी स्तंभालेख, वर्तुळ या सांख्यिकीय अभ्यास पद्धतीचा उपयोग करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती किंवा मर्यादा

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे संशोधन सुरू होण्यापूर्वी संशोधनाची निश्चित व्याप्ती आणि मर्यादा ठरविणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे अवकाशात विमानाला निश्चित दिशा दाखविण्याचे काम होकायंत्र करीत असते त्याचप्रमाणे संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी संशोधनाला मर्यादा असणे आवश्यक असते. संशोधनाला मर्यादा नसेल तर संशोधन कार्य मूळ उद्देशापासून भरकटत असते. प्रस्तुत संशोधनात महाराष्ट्रातील ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार केला असला तरी महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या ऱ्हासास कारणीभूत असलेल्या घटकांचा अभ्यास २०१४ ते २०२३ हा कार्यकाळ निश्चित केला आहे. ही या संशोधनाची मर्यादा व व्याप्ती आहे. अपवादात्मक परिस्थितीमध्ये संशोधनाच्या अनुषंगाने काही संदर्भ येऊ शकतात ही या संशोधनाची मर्यादा आहे.

तथ्य संकलन

प्रस्तुत संशोधन विषय मूलभूत संशोधनात येत असल्यामुळे संशोधन कार्यासाठी माहितीची जमवाजमव करण्याच्या उद्देशाने द्वितीय स्त्रोताचा उपयोग केला आहे. यामध्ये "महाराष्ट्रातील सत्ता बदल, राजकीय विश्लेषणासाठी विधानसभा निवडणूक २०१४ व

२०२३ या विषयाशी निगडित शासकीय अहवाल प्रकाशने, खाजगी संस्थाचे प्रकाशने, वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ, इंटरनेट इत्यादींचा उपयोग करण्यात येणार आहे.

संशोधनाचा आराखडा

संशोधनाला व्यवस्थित आकार प्राप्त होण्यासाठी संशोधन विषयाची विभागणी विविध प्रकरणांत पुढीलप्रमाणे केली आहे..

प्रकरण पहिले : प्रस्तावना

शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना, संशोधन समस्या, संशोधन विषयाचे उद्दिष्टे, संशोधन विषयाचे गृहीतके, संशोधन पद्धती, संशोधनाचे क्षेत्र, संशोधनाचे महत्त्व, तथ्य संकलन आणि प्रस्तुत अभ्यासासंदर्भात पूर्वसंशोधकांनी व्यक्त केलेली मते इत्यादींचा अभ्यास यामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : महाराष्ट्र राज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी

शोधप्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात इ.स. १००० पर्यंतची परिस्थिती, मध्ययुगीन कालखंड, ब्रिटीश कालखंड व महाराष्ट्राची भूमिका, भारतीय स्वातंत्र्य लढा आणि महाराष्ट्र, १८५७ चा उठाव आणि महाराष्ट्र, बॉम्बे असोसिएशन, सार्वजनिक सभा, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि महाराष्ट्र, मवाळवादी कालखंड, जहालवादी कालखंड, गांधीवादी कालखंड, सविनय कायदेभंग चळवळ आणि महाराष्ट्र, भारत छोडो चळवळ आणि महाराष्ट्र, महाराष्ट्रातील क्रांतीकारी चळवळी, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, राज्य पूनर्रचना आयोग, महाराष्ट्र राज्याची निर्मिती, मुख्यमंत्री पदाचा आढावा इत्यादी घटकांचा अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव पाडणारे घटक

प्रस्तुत तिसऱ्या प्रकरणामध्ये महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव पाडणारे विविध घटकांचा अभ्यासले जाणार आहेत. यामध्ये जातीच्या व्याख्या, अर्थ, जातीव्यवस्था, जातीच्या राजकारणाचे आधारभूत घटक, स्वातंत्र्यपूर्व काळात राजकीय पक्षाचा जातीयेतेचा आधार, घटक राज्यात जातीचे वर्चस्व, महाराष्ट्रातील जातीय राजकारण, धर्म आणि राजकारण, प्रादेशिक अस्मिता व भाषीक प्रश्नांचा प्रभाव, सहकार क्षेत्र आणि राजकारण, शेतकरी आंदोलने, महाराष्ट्राच्या राजकारणावर आरक्षणाचा प्रभाव इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : काँग्रेस पक्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तुत चौथ्या प्रकरणामध्ये स्वातंत्रपूर्वकाळात काँग्रेस पक्षाचे झालेली स्थापना, तीचे कार्य, ब्रिटिश विरोधी भूमिका, स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, अधिवेशने इत्यादी घटकांचा अभ्यास यामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचा ऱ्हास

प्रस्तुत पाचव्या प्रकरणामध्ये भ्रष्टाचारांची प्रमुख प्रकरणे, काळा पैसा, अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचार विरोधी उपोषण, वाढती महागाई, बेरोजगारीत वाढ, शेती मालाला कवडीमोल भाव, असुरक्षित सीमा, ढासळती कायदा व सुव्यवस्था, शेतकऱ्यांच्या आत्महत्यात वाढ, आघाडयाचे राजकारण, मराठा आरक्षणाचा प्रश्न, धनगर आरक्षणाचा प्रश्न, मुस्लीम आरक्षणाचा प्रश्न, सोशल इंजिनीरिंगचा प्रयोग, प्रस्थापित राजकीय पक्षाला विरोध, सुशासन व पारदर्शक शासनाची कल्पना महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४, राजकीय नेतृत्व, संघटनात्मक बांधणी, विचारप्रणालीचा आधार, सामाजिक आधार

विधानसभा निवडणूक निकाल २०१४ ते २०२३ चा तुलनात्मक अभ्यास प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे

शोधप्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणात संशोधनाअंती हाती आलेले निष्कर्ष व शिफारशी करण्यात येणार आहेत.

संदर्भग्रंथ

१. लोकसत्ता दैनिक वर्तमानपत्र, २६ मे २०१४

२. मीनाक्षी सिंह, भारतीय राजनीति में भ्रष्टाचार, ओमेगा पब्लिकेशन, नईदिल्ली

३. अण्णा हजारे, निभर्य बनो, (मार्गदर्शिका), सुधारित आवृत्ती, जुलै २००९, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास

४. परिवर्तनाचा वाटसरू, संपादक मंडळ, अभय कांता, तुकाराम जाधव, विजय कुंजीर, प्रकाशक, नर्मदा आफसेट, पुणे

५. तुकाराम जाधव-संपादक, महाराष्ट्र वार्षिकी २०१५, प्रकाशन, युनिक ॲकॅडमी पुणे,

६. प्रकाश पवार, काँग्रेसपुढील आव्हाने आणि भाजपचा उदय, डायमंड प्रकाशन, पुणे

७. महाराष्ट्र निवडणूक आयोगाचे संकेत स्थळ

८. सी.एस.डी.एस.ची आकडेवारी सुहाय पळसीकर, द इंडियन एक्सप्रेस आणि चाणक्यची आकडेवारी

९. प्रदीप आगलावे, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती २०००

१०. भारतीय संस्कृतीचा एनसायक्लोपीडिया - एड. पं. महादेवशास्त्री जोशी, अनमोल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००३, पृ. ७४९

११. बोधनकर व अलोणी (२००७), सामाजिक संशोधन पध्दती साईनाथ प्रकाशन, नागपूर,

१२. घाटोळे, रु. नाही. (२००३), समाजशास्त्रीय तत्त्वे आणि पद्धती श्री मंगेश प्रकाशन नागपूर

१३. पाटील, बा.भा., संशोधन पध्दती, प्रशांत पब्लिकेशन, प्रथमावृत्ती २००६, पुणे

१४. www.wikipedya.org

संशोधक

शेट्टीवार सायलु पंढरी

मार्गदर्शक

प्रा. डॉ. प्रताप वामनराव पाटील
राज्यशास्त्र विभागप्रमुख
बहिर्जी स्मारक कॉलेज, बसमत
ता.बसमत जि.हिंगोली